# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२७/०२/२०१९
## दि.२६/०२/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे १८१/१९,भादविक ३०४(अ),३४ |
| **फिर्यादी** | धनंजय आतकरे,वय-३७ वर्षे,रा.गोकुळनगर,कात्रज,पुणे |
| **आरोपी** | मे.हेमी कन्स्ट्रक्शन प्रा.लिमी. चे संचालक व साईट व्यवस्थापक इंजीनिअर (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०१/२०१९ रोजी ११/४५ वा. हेमी पार्क सोसायटी बी-विंग डकट,कात्रज-कोढवा रोड गोकुळनगर,कात्रज,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद मे.हेमी कन्स्ट्रक्शन प्रा.लिमी.चे संचालक व साईट व्यवस्थापक इंजीनिअर यांनी त्यांचे पुणे येथील नमुद ठिकाणी बांधकाम चालु असलेल्या साईटवरील,मजुर कामगारां कडुन काम करवुन घेत असताना,कामगार व त्यांचे मुलांचे जिवीताचे व सुरक्षिततेच्या दृष्टी कोनातुन इमारतीचे उघडया डक्टवर योग्य ती साधन ठेवण्याची सोय न करता,हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे,हेमी पार्क बी-विंग बिल्डींगचे टेरेस प्रवेशाच्या ठिकाणी दरवाजे बसविण्यासाठी वारंवार टेरेसवरील बिल्डींगला असलेल्या डकचे बाजुने संरक्षण भिंत न करता त्याचप्रमाणे बी-विंगचे बांधकाम काम चालु असलेल्या डक मध्ये संरक्षण करीता कोणत्याही प्रकारची जाळी बांधलेली नसल्याने,फिर्यादी यांचा मुलगा ओम धनंजय आतकरे,वय-१२ वर्षे हा बी-विंग बिल्डीगचे टेरेसवरील डक्ट मधुन खाली पडुन मयत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक,(गुन्हे), विष्णु ताम्हाणे ९८२३१९५०९४ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे १८२/१९,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | संजय देव,वय-५३ वर्षे,रा.आयसीएस कॉलनी,भोसलेनगर,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/१०/२०१८ रोजी पहाटे ०४/०० वा. फिर्यादीचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे पिंपरी शाखा,पुणे येथील बँकेचे बचत खात्याचा मोबाईल बॅकींग पासवर्डची मुदत संपल्यामुळे त्यांनी सदर खात्याचा नवीन पासवर्ड मिळणेकामी बॅकेकडे अर्ज केला होता. त्यावरुन फिर्यादी यांचे मोबाईल मध्ये बॅकेकडुन त्यांचे मोबाईल व ई-मेल वर पासवर्ड आला असल्याने,नमुद वेळी त्यांचे मोबाईलवरुन बँकीग ॲपवरुन लॉग ईन केला असता,कोणीतरी अज्ञात मोबाईलधारकाने फिर्यादी यांचा मोबाईल हॅक करुन,फिर्यादी यांचे पिंपरी,पुणे शाखे मधील बँकेचे खात्यामधुन एकुण चार वेळा ट्रान्झेक्शन करुन,सदर खात्या मधुन एकुण १,४३,०२०/- रुपये काढुन घेवुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक,(गुन्हे), वैशाली गलांडे ९०११०३७७६२ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १८९/१९,भादविक ४२० |
| **फिर्यादी** | नारायण गोडगे,वय-५९ वर्षे,रा.मगरपट्टा,हडपसर,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/१०/२०१८ रोजी सकाळी ०७/०० वा.ते ०७/३० वा.चे दरम्यान एसबीआय बँक शाखा हडपसर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे हडपसर शाखा,पुणे येथील बँकेतील बचत खात्यामधील रोख रक्कम ८०,०००/- रुपये कोणीतरी अज्ञात इसमाने कोपरखैरणे,जि.ठाणे येथील बँकेचे एटीएम सेंटर मधुन काढुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. (सदरचा गुन्हा तक्रारी अर्जावरुन दाखल करण्यात आला आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. व्हि.व्हि.पुणे ९४०३१८८३१८ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १९१/१९,भादविक ४१९,४२०,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३४ वर्षे,रा.मांजरी-बुद्रुक,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईल व बँकेचे खातेधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/१०/२०१८ ते दि.२०/११/२०१८ रोजीचे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईलधारकांनी आपसात संगनमत करुन,डिव्होसी मॅट्रीमोनी साईटवर फिर्यादीं यांना संपर्क साधुन,त्यांचेशी ओळख वाढवुन त्यांचेबरोबर लग्न करणार आहे असे भासवुन,त्यांना लग्नाचे गिफ्ट पाठवित असल्याचे सांगुन,ते गिफ्ट सोडवुन घेण्याच्या बहाण्याने फिर्यादीस नमुद इसमांचे बँकेचे खात्यावर एकुण १,५१,४३४/- रुपयेची फसवणुक केली आहे. (सदरचा गुन्हा तक्रारी अर्जावरून दाखल करण्यात आला आहे.) |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. तांबे ९८२३७०५४५५ |

## प्रेसनोट

दिनांक २५/०२/२०१९

**छायाचित्र स्पर्धा** "पोलीस इन ॲक्शन नागरीकांची सेवा आणि सुरक्षितेसाठी कार्यरत पोलीस" या विषयावर विनामुल्य छायाचित्र स्पर्धेबाबत.

पुणे पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या संकल्पनेतून १. प्रेस/ प्रोफेशनल छायाचित्रकार, २. हौशी छायाचित्रकार ३. पोलीस खात्यातील अधिकारी/कर्मचारी त्यांचे कुटूंबिय या गटांकरीता "पोलीस इन ॲक्शन - नागरीकांची सेवा आणि सुरक्षिततेसाठी कार्यरत पोलीस" या विषयावर **विनामुल्य छायाचित्र** स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेकरीता हौशी छायाचित्रकार या गटांमध्ये कोणीही नागरिक सहभागी होवु शकतो.

सदर स्पर्धेकरीता प्रथम क्रमांक - रोख ५००० रू व शिल्ड, द्वितीय क्रमांक, - रोख ३००० रू व शिल्ड, तृतीय क्रमांक - रोख २००० रू व शिल्ड व उत्तेजनार्थ २ बक्षीसे देण्यात येणार आहेत.

प्रवेशिका http//www.pixlent.com/punepolicephotocontet या संकेतस्थळावर उपलब्ध असून फोटो (इमेज) वरील दिलेल्या संकेत स्थळावर **ऑनलाईन** पाठवावेत.

**स्पर्धेसाठीचे नियम व अटी-**

१. प्रत्येक स्पर्धकाने जास्तीत जास्त ५ इमेज JPG फॉरमॅटमध्ये ३०० DPI 5 MB साईजचे ओरीजनल व स्वत काढलेल्या इमेज असाव्यात. इमेजवर कोणत्याही प्रकारचे वॉटरमार्क, लोगो, चिन्ह नसावे
२. दिनांक २५/०२/२०१९ रोजीची ही मुदत दि.१२/०३/२०१९ पर्यंत वाढविली असुन दि.१२/०३/२०१९ पर्यंत प्रवेशिका व फोटो नमुद संकेतस्थळावर स्विकारण्यात येतील
३. निवड झालेले फोटोग्राफ्स हे आयोजक आपल्या प्रदर्शनासाठी व माहिती पुस्तीकेसाठी वापरु शकतील.
४. इमेज पाठविण्यासाठी http//www.pixlent.com/punepolicephotocontet या संकेतस्थळाचा वापर करावा. सदरचे संकेतस्थळ **रजिस्ट्रेशन केल्यानंतरच** या स्पर्धेत भाग घेता येईल.
५. प्रत्येक स्पर्धकाने त्याचा ईमेल आयडी व मोबाईल नंबर देणे आवश्यक आहे.
६. मोबाईल किंवा स्मार्ट फोन ने काढलेली छायाचित्रे सुध्दा स्पर्धेत पाठविता येतील.
७. फोटोग्राफ निवडीसाठी परीक्षक समितीचा निर्णय अंतिम राहील.

**छायाचित्र स्पर्धेसाठी पुणे शहरातील १. प्रेस/प्रोफेशनल छायाचित्रकार, २. हौशी छायाचित्रकार, ३. पोलीस अधिकारी / कर्मचारी तसेच त्यांचे कुटूंबिय असे गट आहेत. हौशी छायाचित्रकार गटात सर्व कॉलेजचे प्रिन्सीपल,व्याख्याते, कॉलेज विद्यार्थी, शिक्षकवृंद, सर्व पत्रकार, उत्सुक व इच्छुक नागरीक यांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा. असे पुणे पोलीसांकडून आवाहन करण्यात येत आहे.**

**अधिक माहितीसाठी- संपर्क अधिकारी-**

१. श्री. अजित लकडे, पोलीस निरीक्षक, विशेष शाखा, पुणे शहर.- ८३२९८०४८३६



# Police in Action

for **SERVICE** & **SECURITY** of People

**PHOTO CONTEST!**

Extended ... to 12 March 2019

TO TAKE PART & KNOW MORE, GO TO

WWW.PIXLENT.COM/PUNEPOLICEPHOTOCONTEST

महाराष्ट्र पोलीस

Pune Police


# Police in Action

## for Service & Security of People



महाराष्ट्र पोलीस

Pune Police




### Photography Contest!

Open to All!

Participate, in one of three groups:

1. **Amateur/ Hobby Photographers**
2. **Police officers, staff & members of their families**
3. **Press/ Professional Photographers**

Prizes in each Group!

1st: **Rs. 5,000**

2nd: **Rs. 3,000**

3rd: **Rs. 2,000**

Two more consolation prizes

**Entry Free!**

Last Date Extended ...

**12 March 2019**

To take part & know more, go to

**www.pixlent.com/punepolicephotocontest**

जनसंपर्क अधिकारी,

पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर